आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२२ ऑगस्ट २०२६ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- ४ वर्षांखालच्या मुलांसाठी क्लोर फिनरा-माइन मॅलिएट आणि फेनिले-फ्राइन हायड्रोक्लोराइड हे दोन घटक एकत्र असलेल्या सर्व औषधांवर केंद्र सरकारकडून बंदी

- सर्व वयोगटातली भारताची महिलाशक्ती हे भारताचं बलस्थान आहे असं काँग्रेस नेते राहुल गांधी यांचं प्रतिपादन

- गुजरातमध्ये वाहनाच्या इंधन टाकीचा स्फोट होऊन २ मुलांसह एकाच कुटुंबातल्या चौघांचा मृत्यू

आणि

- बीडब्ल्यूएफ बॅडमिंटन जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत भारताचं आव्हान संपुष्टात, त्रिसा जॉली आणि गायत्री गोपीचंद यांना कांस्यपदक

**<><><><>**

क्लोर फिनरा-माइन मॅलिएट आणि फेनिले-फ्राइन हायड्रोक्लोराइड हे दोन घटक एकत्र असलेल्या सर्व औषधांचं ४ वर्षांपेक्षा लहान मुलांसाठी उत्पादन, विक्री आणि वितरणावर सरकारनं बंदी घातली आहे. आरोग्य मंत्रालयानं यासंबंधीची अधिसूचना जारी केली आहे. 'चार वर्षांखालील मुलांना ही औषधं देऊ नयेत', असा स्पष्ट इशारा या औषधांच्या वेष्टनावर नमूद करणं, अनिवार्य करण्यात आलं आहे. या वयोगटातल्या मुलांसाठी ही औषधं हानीकारक असू शकतात आणि यापेक्षा जास्त सुरक्षित असलेले पर्याय उपलब्ध आहेत, असंही सरकारनं म्हटलं आहे.

**<><><><>**

भारताच्या ब्रिक्स अध्यक्षतेअंतर्गत आज चेन्नई इथं पार पडलेल्या ब्रिक्स देशांच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्र्यांच्या बैठकीत चेन्नई जाहीरनामा स्वीकारण्यात आला. केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र सिंह हे या बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोन्मेष या क्षेत्रांसंबंधीच्या ब्रिक्सच्या कार्यक्रमपत्रिकेअंतर्गत ग्लोबल साऊथ अंतर्गत येणारे देश, युवा नवोन्मेषक आणि परस्पर सहकार्यपूर्ण संशोधनावर या जाहीरनाम्यात भर दिला गेला आहे.

दरम्यान, ब्रिक्स देशांच्या युवा मंत्र्यांची बैठक आज विशाखापट्टणम इथं झाली. शिक्षण, प्रशिक्षण आणि कौशल्य, युवा नवोन्मेष, विज्ञान आणि तंत्रज्ञान, आरोग्य आणि क्रीडा, पर्यावरण आणि शाश्वतता, सामाजिक आणि सांस्कृतिक सहभाग इत्यादी क्षेत्रांवर काम करायची गरज या बैठकीत सहभागी झालेल्या युवा मंत्र्यांच्या संयुक्त निवेदनात अधोरेखित करण्यात आली. भविष्याला आकार देण्यासाठी युवांचा सहभाग मोलाचा असल्याचं प्रतिपादन युवा व्यवहार आणि क्रीडामंत्री मनसुख मांडवीय यांनी केलं.

ब्रिक्सच्या क्रीडामंत्र्यांची बैठक उद्या विशाखापट्टणम इथं होणार आहे.

<><><><>

गोव्यात २० ते २८ नोव्हेंबर २०२६ दरम्यान होणाऱ्या ५७व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव इफ्फीच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉक्टर एल. मुरुगन यांच्या अध्यक्षतेखाली आज नवी दिल्लीत बैठक झाली. युवा कलाकारांना त्यांची सर्जनशीलता सादर करण्यासाठी उत्तम व्यासपीठ मिळावं, प्रस्थापित चित्रपट निर्मात्यांकडून त्यांना शिकता यावं आणि जागतिक चित्रपट समुदायाशी संवाद साधता यावा, यासाठी इफ्फीनं अधिक प्रभावी भूमिका बजावावी, असं आवाहन डॉ. मुरुगन यांनी केलं.

<><><><>

सर्व वयोगटातली भारताची महिलाशक्ती हे भारताचं बलस्थान आहे असं काँग्रेसचे नेते आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी म्हटलं आहे. ते आज पुण्यात छात्रों की गूँज या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना, विशेषतः विद्यार्थिनींना संबोधित करत होते. महिलांकडे मुलगी, पत्नी आणि आई म्हणून पाहिलं जातं, मात्र इतकीच महिलांची ओळख नाही. आपल्या समाजात प्रत्येक क्षेत्रात वेगळं काम करून दाखवणाऱ्या प्रतिभावान महिला आहेत, असं प्रतिपादन त्यांनी केलं. मनुस्मृतीत महिलांच्या अस्तित्व आणि ओळखीबाबत केलेली मांडणी स्वीकारार्ह नाही असं ते म्हणाले. महिला या कोणाची तरी मुलगी, पत्नी आणि आई असल्या तरी त्या त्यांची मालमत्ता नाहीत, त्याचंही स्वतंत्र अस्तित्व आहे असं ते म्हणाले. हिंसा, अपमान, कालमर्यादा आणि नियंत्रणाच्या माध्यमातून समाज महिलांवर ताबा ठेवू पाहतो असं ते म्हणाले. देशात दरवर्षी साडेचार लाख स्त्री भ्रूण हत्या होतात. ८० टक्के महिलांचा कोणत्या ना कोणत्या प्रकारे छळ केला जातो, ३० टक्के महिलांविरोधात शारिरीक हिंसा होते, तर ६

टक्के महिलांवर बलात्कारासारख्या घटना होतात. सुरक्षेच्या कारणास्तव ५० टक्के महिला शिक्षण आणि नोकऱ्यांपासून दूर राहतात, देशातल्या साधारण महिलांना स्वतःच्या सुरक्षेपोटी प्रत्येकी साडेसतरा हजार कोटी खर्च करावे लागतात अशी आकडेवारी त्यांनी या संवादात मांडली.

**<><><><>**

परकीय चलनाचे व्यवहार करण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेची मान्यता असलेल्या बँकांनी २१ ऑगस्टपर्यंत ७२ अब्ज ८४ कोटी अमेरिकी डॉलर इतका परकीय चलनसाठा उभा केला आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेनं याबाबतचा तपशील जारी केला आहे. या तपशीलानुसार यातला मोठा वाटा हा एफ. सी. एन. आर. बी. अर्थात अनिवासी भारतीयांसाठीच्या विदेशी चलनातील ठेव योजनेअंतर्गतच्या ठेवींचा आहे. या ठेवींअंतर्गत सुमारे ६५ अब्ज ३९ कोटी अमेरिकी डॉलर इतकं परकीय चलन देशात आलं आहे. रुपयाची घसरण रोखण्यासाठी आणि परकीय चलनाची आवक वाढवण्यासाठी रिझर्व्ह बँकेनं ८ जून २०२६ रोजी विशेष स्वॅप योजना सुरू केली होती. या योजनेसह बाह्य व्यावसायिक कर्ज आणि परदेशी चलनातील इतर कर्ज उभारणीच्या माध्यमातून २१ ऑगस्टपर्यंत आणखी ७ अब्ज ४५  कोटी अमेरिकी डॉलर इतका परकीय चलनसाठा उभा राहिल्याचंही बँकेनं म्हटलं आहे.

दरम्यान, १४ ऑगस्टला संपलेल्या आठवड्यात भारताच्या परकीय चलनसाठ्यात ९ अब्ज ९ कोटी अमेरिकी डॉरलं वाढून, ७१६ अब्ज ९० कोटी अमेरिकी डॉलर या ऐतिहासिक उच्चांकावर पोहोचला असल्याचंही रिझर्व्ह बँकेनं म्हटलं आहे.

**<><><><>**

गुजरातच्या कच्छ जिल्ह्यात एका व्यावसायिक वाहनाच्या इंधनाच्या टाकीचा स्फोट होऊन एकाच कुटुंबातल्या चौघांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये २ लहान मुलांचाही समावेश आहे. या गाडीतून भंगार सामान उतरवत असताना हा स्फोट झाला. तो इतका मोठा होता, की गाडीच्या जवळ असलेली २ मुलंही ठार झाली.

**<><><><>**

गुजरातच्या भावनगर जिल्ह्यात विषारी दारू पिऊन मृत्यूमुखी पडलेल्यांची संख्या ९वर गेली आहे. आज एकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला, तर उपचार घेत असलेल्या

१७पैकी तिघांची स्थिती गंभीर आहे. या प्रकरणी पोलिसांनी २१ पैकी १३ आरोपींना अटक केली आहे.

<><><><>

'कोचीन शिपयार्ड लिमिटेड'नं मंगरोल ही तिसरी पाणबुडी विरोधी युद्धनौका आज भारतीय नौदलाकडे सुपूर्द केली. ८० टक्के स्वदेशी बनावटीची ही नौका, पाण्याखाली टेहळणी करणं, पाणबुडी विरोधी युद्धमोहिमा, समुद्रातले सुरुंग नष्ट करणं ही कामं अधिक सक्षमपणे करू शकेल, अशी माहिती संरक्षण मंत्रालयानं दिली आहे. यावर प्रगत रडार, अत्याधुनिक टोपेर्डोज, पाणबुडी-विरोधी रॉकेट्स बसवण्यात आली असल्याचं मंत्रालयानं म्हटलं आहे.

<><><><>

गोवा प्रशासनानं 'कर्करोग' या आजाराचा समावेश, 'सूचित करण्यायोग्य आजारांच्या यादीत' समावेश केला आहे. कर्करोगाचं निदान झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत त्याची माहिती सरकारी अधिकाऱ्यांना देणं आरोग्य सेवा क्षेत्र आणि प्रयोगशाळांना आता अनिवार्य झालं आहे. यामुळे कर्करोगाच्या रुग्णांवर देखरेख ठेवणं, तपासणी आणि उपचाराचं नियोजन करणं सोयीचं होणार आहे.

<><><><>

अमेरिकेनं २० बिलियन डॉलर किंमतीच्या कॅनडाच्या उत्पादनांवर ५० टक्के आयात शुल्क लादलं आहे. आजपासून हे शुल्क लागू झालं. याला योग्य प्रत्युत्तर देऊ, असं कॅनडानं म्हटलं आहे. या दोन देशांमधला तणाव कमी करण्यासाठी सुरू असलेली चर्चा शेवटच्या क्षणी फिसकटली.

<><><><>

बीडब्ल्यूएफ बॅडमिंटन जागतिक अजिंक्यपद स्पर्धेच्या महिला दुहेरीतलं भारताचं आव्हान आज संपुष्टात आलं. त्रिसा जॉली आणि गायत्री गोपीचंद या जोडीला उपांत्य फेरीत चीनच्या अग्रमानांकित लिउ शेंग शू आणि तान निंग या जोडीकडून २१-१८, १३-२१, ८-२१ असा पराभव पत्करावा लागला. या पराभवामुळे त्यांना कास्यपदकावर समाधान मानावं लागलं. पहिला गेम हरल्यानंतर दुसऱ्या गेममध्ये त्रिसा आणि गायत्री यांनी पुनरागमन केलं

आणि तो गेम जिंकून सामना निर्णायक गेमपर्यंत नेला. पण चीनच्या जोडीनं तिसऱ्या गेममध्ये सुरुवातीपासूनच निर्विवाद वर्चस्व गाजवत सामना जिंकला आणि अंतिम फेरीत प्रवेश केला.

<><><><><>

स्लोव्हाकिया इथं सुरू असलेल्या २० वर्षांखालच्या कुस्ती जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या महिला कुस्तीपटूंनी आणखी ३ पदकांची कमाई केली. ६८ किलो वजनी गटात मानसी लाठेर हिला अटीतटीच्या सामन्यात चीनच्या प्रतिस्पर्ध्याकडून १-२ असा पराभव पत्करावा लागला आणि रौप्यपदकावर समाधान मानावं लागलं. ५७ किलो वजनी गटात तन्वी मगदुम आणि ५९ किलो वजनी गटात कोमल हिनं आपापल्या प्रतिस्पर्ध्यांना हरवून कांस्यपदक पटकावलं.

<><><><><>

एफआयएच हॉकी विश्वचषक स्पर्धेत भारताच्या पुरुष संघाचा सामना आज यजमान नेदरलँड्सविरुद्ध सुरू आहे.

ड गटातल्या सामन्यात भारतानं पाकिस्तानचा ५-३ असा पराभव करून दुसरं स्थान पटकावलं आहे. आता भारत आणि इंग्लंड हे दोन देश, अ गटात पहिल्या आणि दुसऱ्या स्थानावरच्या २ संघांसह ई गटात जातील.

//<><><><><>//